**नि.फौ.ख.क्र.१४०/२०२४**

**शासन वि. रुपेश**

**नि.क्र. ०६**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष व्ही. सी. द्वारे नोंदविण्यात येते.</u>**

**सदर साक्षीदाराचा पुरावा दृक श्राव्य माध्यमाद्वारे Google Meet चा वापर करुन मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथून सहभागी झालेल्या साक्षीदाराच्या आभासी उपस्थितीत नोंदविण्यात येत आहे. पुरावा नोंदणी सुरु करतेवेळी आवाज वा दृश्याबाबत कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण नाही.**

नावः रुना बेगम आयशा मोहम्मद लहू शेख,

वयः २७ वर्ष, धंदाः घरकाम

पत्ताः बांगलादेश

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र.१ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.व्ही.तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः</u>**

**१.** मी भारतामध्ये सीमारेषा ओलांडून आली, मी भारतामध्ये आल्यावर घरकाम करीत होती. मी तडोजा रोड कॅम्प, मुंबई येथे राहत होती व तेथे घरकाम करित होती. एक महिला मला भेटली व तिने मला सांगितले एका ठिकाणी काम आहे चांगले पैसे मिळतील. त्या महिलेचे नाव मला माहीत नाही. त्या महिलेने दुसऱ्या महिलेसोबत संपर्क केला. दुसरी महिला कुठे राहत होती हे मला माहीत नाही. त्या महिलेसोबत माझा संपर्क झाला नाही. माझा रोशनी नामक महिलेने काकडे सोबत संपर्क केला व काकडेला माझा नंबर दिला, काकडेने मला बोलावून घेतले. काकडेने मला नागपूर येथे बोलाविले होते. नागपूरवरुन ट्रव्हर्सने मला ईटगाव येथे बोलाविले व ईटगाव येथून तो मला घेऊन गेला. मला एक इसम हॉटेलात घेऊन गेला. हॉटेलमध्ये गेल्यावर मला काम करण्यास सांगितले पैशाची गोष्ट केली तेव्हा जाता वेळेस पैसे घेऊन जा असे बोलणे झाले. हॉटेलमध्ये कस्टमर येत होते त्यांना हॅण्डल करण्याचे काम करीत होती.

व्यवस्थापक ग्राहक आणीत होता. मी देह विक्रीचे काम करीत होती. मी तेथे मागच्या वर्षी मार्च महिन्यात काम करीत होती. पोलीस आले व मला ठाण्यात घेऊन गेले. पोलीस येण्यापूर्वी काय झाले हे मला आठवत नाही. मी व्यवस्थापक व काकडे यांना ओळखू शकते. (दोनही आरोपींना साक्षीदारास कॅमेराद्वारे दाखविले असता सदर आरोपी हे व्यवस्थापक व काकडे नसल्याचे सांगितले.) साक्षीदार सांगते की, कॅमेराद्वारे दाखविण्यात आलेले चेहरे आज रोजी स्पष्ट पाहिले आहे. ज्या हॉटेलमध्ये मी काम करीत होती त्या हॉटेलचे नाव मला माहीत नाही.

**साक्षीदार आपल्या पुर्वीच्या दिलेल्या जबाबा प्रमाणे साक्ष देत नसल्याने त्याला उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची तोंडी परवानगी सहायक सरकारी अभियोक्ताने मागितली. परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, ज्या महिलेसोबत माझी पहिल्यांदा ओळख झाली तिचे नाव काजल होते. दुसऱ्या महिलेचे नाव सोनू होते किंवा काय मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पुणे येथे देहविक्रीचे काम करीत होती. हे म्हणणे खरे नाही की, पुणे येथे देहविक्रीचा काम करीत असतांना मला रोशनी हिचा फोन नंबर मिळाला. हे म्हणणे खरे आहे की, रोशनी ही नागपूर येथे राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, रोशनी हिने मला नागपूर येण्यास सांगितले. त्यावरुन मी मुंबई येथून लक्झरी बसने नागपूर येथे आली. हे मला आठवत नाही मी ०७ मार्च, २०२४ रोजी नागपूर येथे आली किंवा काय. हे मला आठवत नाही की रोशनी हिने मला बसने नागपूर येथून इटगाव येथे जाण्यास सांगितले किंवा काय. साक्षीदार स्वतःहून सांगते की मला इटगाव येथे जाण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी ईटगाव येथे पोहोचले. हे मला माहीत नाही की, काकडे बार रेस्टॉरेंट एण्ड लॉजिंगचा मनुष्य मला घेण्यास आला होता किंवा काय. मला घेण्यास एक मनुष्य आला होता. हे मला आठवत नाही की, हॉटेलमध्ये काकडे काका भेटला होता. हे मला माहीत नाही की काकडे काका चे नाव रामूजी उर्फ रामदास गुंडेराव काकडे होते किंवा काय. हे म्हणणे खरे आहे की काकडे काकाच्या सांगण्यावरुन मला हॉटेलमध्ये जागा मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, काकडे काकानी मला सांगितले होते की एका ग्राहकाचे रु. ५००/–

मिळणार. हे मला आठवत नाही की, आलेल्या सर्व ग्राहकांची माहिती मी काकडे काकाला देत होती. हे मला आठवत नाही की, सर्व ग्राहकाची माहिती मी काकडे काकाच्या व्हॉट्सएप वर पाठवित होती किंवा काय. हे म्हणणे खरे आहे की हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांना देहविक्री करीत होती. हे म्हणणे खरे आहे की मला देहविक्रीचे पैसे मिळाले नव्हते. हे मला आठवत नाही की, एका ग्राहकासोबत बोलत असता पोलिसांनी छापा टाकला किंवा काय. हे मला आठवत नाही की, पोलिसांनी छापा टाकला तेव्हा  माझ्या खोलीत एक ग्राहक होता किंवा काय. हे म्हणणे खरे आहे की पोलिसांनी माझा मोबाईल जप्त केला होता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आज न्यायालयात कॅमेराद्वारे पाहिलेल्या दोनही आरोपी व्यवस्थापक व काकडे काका होते. हे म्हणणे खरे नाही की, दोनही आरोपींना वाचविण्याकरिता मी त्यांना आज न्यायालयात ओळखले नाही.

सरतपास पूर्ण

**मध्यान्ह वेळ झाल्याकारणास्तव उलटतपास तहकूब**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.10.14 16:22:08 +0530

(**जी.ओ. वानखडे**)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

**समक्ष**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.10.14 16:22:12 +0530

(**जी.ओ. वानखडे**)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः १४/१०/२०२५

**<u>मध्यान्हानंतर साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास  व्ही. सी. द्वारे आरोपी क्र. १ व २ तर्फे श्री. पालीवाल वकील साहेब यांच्यामार्फेत शपथेवर सुरु.</u>**

**सदर  साक्षीदाराचा पुरावा दृक श्राव्य माध्यमाद्वारे Google Meet चा वापर करुन मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथून सहभागी झालेल्या साक्षीदाराच्या आभासी उपस्थितीत नोंदविण्यात येत आहे. पुरावा नोंदणी सुरु करतेवेळी आवाज वा दृश्याबाबत कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण नाही.**

३.    मी अशिक्षित आहे. हे म्हणणे खरे आहे की, भारतात आली तेव्हापासून ते जेलमध्ये जाईपर्यंत धुणे भांडे व घरचे काम करीत होती. हे म्हणणे खरे आहे की या शिवाय मी कोणताही व्यवसाय केला नाही. मला आठवत नाही की रोशणी व काजल हे नाव मी न्यायालयात प्रथम ऐकले किंवा काय. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहीत वाचता येत नाही. हे मला माहीत नाही की साक्ष काय द्यावी हे मला पोलिसांनी सांगितले किंवा काय. मुंबई येथून नागपूरला लक्झरी बसने आली त्याची टिकीट मी पोलिसांना दिली नव्हती किंवा पोलिसांनी मला मागितली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी इटगाव या गावात कधीही आली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी काकडे काका यांना ओळखत नाही. माझ्या मोबाईल खरेदीचे बील मी पोलिसांना दिले नाही तसेच पोलिसांनी मला मागितले नाही. पोलिसांनी माझे बयान थान्यात नोंदविले होते.

४.    मी पोलिसांना बयान देता वेळीस असे सांगितले होते की,
**"मी भारतामध्ये सीमारेषा ओलांडून आली,तिने मला सांगितले एका ठिकाणी काम आहे , त्या महिलेने दुसऱ्या महिलेसोबत संपर्क केला, माझा रोशनी नामक महिलेने काकडे सोबत संपर्क केला व काकडेला माझा नंबर दिला, काकडेने मला बोलावून घेतले. काकडेने मला नागपूर येथे बोलाविले होते , नागपूरवरुन ट्रव्हर्सने मला ईटगाव येथे बोलाविले व ईटगाव येथून तो मला घेऊन गेला, हॉटेलमध्ये गेल्यावर मला काम करण्यास सांगितले,  हॉटेलमध्ये कस्टमर येत होते त्यांना हॅण्डल करण्याचे काम करीत होती, व्यवस्थापक ग्राहक आणीत होता, मला ठाण्यात घेऊन गेले."** परंतु सदर मजकूर माझ्या बयाणात नमूद नाही ते का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

हे म्हणणे खरे नाही की सरतपासात सांगितलेल्या कथित घटना तसेच अभियोग पक्षाच्या उत्तरसुचक प्रश्नास  सांगितलेल्या घटना कधीही  घडल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.10.14 16:22:19 +0530

(**जी.ओ. वानखडे**)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

**समक्ष**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.10.14 16:22:24 +0530

(**जी.ओ. वानखडे**)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः  १४/१०/२०२५